सायं.दैनिक
# विश्वनायक
• संपादक : बिलाल शेख •
Email : vishvanayak94@gmail.com
Mo-9422404740

| बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - १२५ बुधवार, दि.१४ मे २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 125 Wednesday, Dt.14 May 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4 |


## बीड भाजप जिल्हाध्यक्षपदाची नियुक्ती रखडली

बीड - भाजपने मंगळवारी राज्यातील ३६ जिल्ह्यांसाठी ५८ जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा केली. या माध्यमातून भाजपने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची जोरदार तयारी केली आहे. पण सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे चर्चेत आलेल्या बीड जिल्ह्यात भाजपने आपला जिल्हाध्यक्ष दिला नाही. मंत्री पंकजा मुंडे व आमदार सुरेश धस यांच्या वादामुळे ही नियुक्ती रखडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.भाजपने काही दिवसांपूर्वीच बीड जिल्ह्यातील मंडळ अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या. पण त्यात भाजप आमदार सुरेश धस यांच्या आष्टी विधानसभा मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची नियुक्ती टाळण्यात आली. त्यानंतर काल भाजपने महाराष्ट्रभरातील जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या. पण त्यातही बीड जिल्ह्याच्या अध्यक्षपदी कुणाचीही वर्णी लावण्यात आली नाही. यामुळे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड भाजपमध्ये निर्माण झालेला वाद अद्यापही कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे व भाजप आमदार सुरेश धस यांच्यातील वादामुळे ही नियुक्ती रखडल्याची चर्चा आहे.

# देवस्थान जमिनीच्या व्यवहारांना ब्रेक

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे नोंदणी विभागाला निर्देश

महाराष्ट्र शासनानं देवस्थान वतन जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांवरील नोंदणी प्रक्रिया तत्काळ थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. पुणे येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या उपमहानिरीक्षक (मुख्यालय) कार्यालयातून जारी झालेल्या परिपत्रकानुसार, शासन धोरण ठरविण्यात येईपर्यंत कोणत्याही देवस्थान इनाम मिळकतींच्या दस्तऐवजांची नोंदणी करता येणार नाही.हा निर्णय १३ मे रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली, कोल्हापूरचे पालकमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत देवस्थान वतन जमिनींसंबंधी अनधिकृत व्यवहार रोखण्यासाठी धोरणात्मक चर्चा झाली आहे.

जमिनींचे व्यवहार थांबणार

शासन धोरण येईपर्यंत देवस्थान जमिनींचे व्यवहार थांबवा असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी विभागास दिले आहेत. फक्त न्यायालयीन आदेश किंवा अधिकृत मंजुरी असलेल्या जमिनींचेच दस्त नोंदणीस मान्य देण्यात येणार आहे.

१३ मे २०२५ रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक झाली होती. त्यात देवस्थान मिळकतीबाबत निर्देश देण्यात आले. देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरवण्यात येत आहे.




### या जमिनीचे व्यवहार टाळा

महसूल विभागाच्या या नवीन आदेशापूर्वी सुद्धा अनेकदा या खात्याने शेतकरी आणि इतरांना अशा जमिनी खरेदी करताना खबरदारीचा इशारा दिला होता. देवस्थान व राखीव वन नोंदी असलेल्या जमिनीची खरेदी डोकेदुखी ठरू शकते. कारण या जमिनीची मालकीचा प्रश्न अडचणीचा ठरतो. अशा जमिनीवर एकतर नावावर होत नाही. त्यामुळे आर्थिक तोटाही होतो. जमीन पण हातातून जाते आणि उल्लंघनाची कारवाई होते ती वेगळीच. काही एजंट विविध यंत्रणांना हाताशी धरून या जमिनी नावे लावून देतात. पण प्रकरण उघड झाले की नामनिराळे होतात. या व्यवहारात जमीन खरेदीदारांचे सर्वात जास्त नुकसान होते. त्यामुळे अशा जमिनी खरेदीचे व्यवहार टाळणे शहाणपणाचे ठरेल.



चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, संस्थापक अध्यक्ष प्रदीप (भाऊ) जोगदंड, सार्वजनिक जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे, सचिव आदित्य हावळे, अक्षय नाईकवाडे सह आदी.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयांत छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी



पाटोदा - फयाज सय्यद

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, प्रोफेसर महादेव काळे, प्रा. गोकुळ कंठाळे, प्रा. धनु ननवरे, बाळासाहेब चौरे, श्रीकृष्ण यादव, लक्ष्मण खाडे, ओंकार बहिरवाल यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीराजेंच्या स्मारकासह महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अनास्था

## ३ वर्षापूर्वी भुमिपुजन करूनही जिल्हा परिषदेतील काम रखडले; छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी धरणे आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड :

जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराजांसह विविध महापुरुषांचे पुतळे उभारणीबाबत १५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेचा ठराव झाला. यासाठी आंदोलने आणि उपोषणेही झाली. नवीन इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजीराजांचे स्मारक आणि इतर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याची घोषणा जिल्हा परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे तत्कालीन पालकमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांनी १९ मार्च २०२२ रोजी पुतळे उभारणीच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु तीन वर्षापासून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करून मागणी करणारे आणि घोषणा करणारे सत्तेत असुन तातडीने स्मारकांचे काम पूर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज दि.१४ मे बुधवार छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात विभागीय अध्यक्ष संभाजी ब्रिगेड राहुल वायकर,,मराठासेवक संजय गोडसे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय छावा संघटना युवराज मस्के, बीड जिल्हाध्यक्ष बुलंद छावा संघटना विठ्ठल बहिर, मराठा सेवक अशोक सुरवसे, राहुल कवठेकर, शेख मुबीन, रामनाथ खोड, पांडुरंग हराळे, रामकिसन कदम, किशोर निर्मळ,अंगद मांडवे,शाकींदर काटकर, मुरलीधर काटकर आदी सहभागी होते. कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जि.प.बीड मोमीन सय्यद शकील सय्यद यांनी आंदोलनस्थळी चर्चा करून सदरील महापुरूषांचे पुतळे बांधण्याकरीता चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नातुन तरतूद ५० लक्ष रुपये इतकी करण्यात आली असुन सदरील ईमारतीचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले.

जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २०१० साली झाला. त्यानंतर पुढे काहीच हालचाल झाली नाही पुढे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ,दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळुंके ,दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांच्या पुतळ्यांच्या उभारण्याची मागणी पुढे आली. त्यानंतर जिल्हा परिषदेचे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम सुरू झाले.नवीन प्रशासकीय इमारतीसमोर पुतळे उभारणीसाठी छत्रपती शंभू प्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्यावेळी तत्कालीन जिल्हा परिषद उपाध्यक्ष व विद्यमान खासदार बजरंग सोनवणे तत्कालीन सभापती जयसिंह सोळंके आदींनी नवीन इमारतीच्या आवारात पुतळे उभारण्याचे आश्वासने दिले होते.

महापुरुषांसह लोकनेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. दि. १९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष बजरंग सोनवणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाइन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपूजनही पार पडले. तेव्हाही सत्तेत असलेले मंडळी आत्ताही सत्तेत आहेत. मात्र महापुरुषांच्या पुतळ्या बाबत सरकारला अनास्था का ? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

जिल्हा परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यापूर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतरच इमारतीत कारभार अशी भूमिका घेत शंभू प्रेमींनी आंदोलने केली होती. दि.१६ जानेवारी २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत लक्ष्यवेधी आंदोलन केल्यानंतर तत्कालीन सिईओ अजित पवार यांनी चबुत-यासाठी ५ लक्ष रुपये व फेब्रुवारी २०२३ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून स्मारकांचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु पुढे काहीच हालचाल नाही.आज आंदोलन स्थळी कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ मोमीन सय्यद शकील अहमद यांनी जिल्हा परिषद बीड येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.शासन निर्णय क्र.जिपई-२०२२/पत्र.क्र.१०/बां.-४ बांधकाम भवन मुंबई दि.२४.०२.२०२५ अन्वये अंदाजपत्रके रक्कम ३५,५७,५७,५२२ मंजुरी मिळाली असुन सदरील




इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाकरिता लश्ररीश ३५ नुसार मा. अधीक्षक अभियंता सा .बां.मंडळ धाराशिव यांची मंजुरी घेऊन पुढील काम करण्यात येईल. व तसेच सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नामधून तरतूद ५० लक्ष ईतकी करण्यात आलेली आहे. तरी सदर इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढे ती योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी दिले आहे. त्यामुळे एकंदरीतच पुतळे उभारण्याच्या फायलीचा प्रवास संथ असुन शासन आणि प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यापैकी कोणालाही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.

## पठाण माजेदखान फिरोजखान यांचे दहावी परीक्षेत यश

पाटोदा (प्रतिनिधी)

दहावीच्या परीक्षेत पठाण माजेदखान फिरोजखान ८८.६०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कष्ट, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे. पठाण माजेदखान फिरोजखान यांनी अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि मेहनत कौतुकास्पद आहे. शाळेच्या शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनासह त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशाने शाळेचे नाव उज्वल केले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे स्रोत ठरले आहेत. युवा नेतृत्व जुनेद भैय्या पठाण परिवारातर्फे पठाण माजेदखान फिरोजखान यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा !



## अलफीया लियाखत बेग यांने परीक्षेत ९०.८०% गुण मिळवत घवघवीत यश

बीड : अलफीया लियाखत बेग हिने परीक्षेत ९०.८०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कष्ट, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. त्याच्या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे.अलफीया लियाखत बेग हिने अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि मेहनत कौतुकास्पद आहे. शाळेच्या शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनासह त्यांनी हे यश मिळवले आहे. त्याच्या यशाने शाळेचे नाव उज्वल झाले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे स्रोत ठरले आहेत. युवा नेतृत्व बेग परिवारातर्फे अलफीया लियाखत बेग याचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आलं आहे.!





चौसाळा येथील बस स्थानकाची कामाची अशी विल्हेवाट लावली जात आहे फक्त खडीचा थर देऊन त्यावरती सिमेंट ना टाकता हातुरमातुर काम सुरू केले आहे

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

कडा (प्रतिनिधी)

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा १००% निकाल लागला असून शाळेतील प्रणव कासवा - ९५.४०% प्रथम क्रमांक , शर्विल भळगट - ९५.२०% द्वितीय क्रमांक, आयुष मुनोत - ९४.२०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर १३ विद्यार्थ्यांनी ८० % पेक्षा जास्त गुण संपादन करून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत.





सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष- श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष - श्री. संदीपजी चानोदिया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री.मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा,श्री संजयजी पितळे, श्री.संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - के. अभिलाष , सल्लागार - पी.जी. मेहेर सर , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले.

# लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या स्नेहा उत्तम मडावी यांची दुसऱ्यांदा निवड

पुणे सुनील भोसले

पुणे येथील सर्किट हाऊस मध्ये आयोजित पद निवड कार्यक्रम घेण्यात आले. लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या वतीने महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीत पुणे जिल्हातील लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र महिला भटक्या विमुक्त जाती जमाती आदिवासी प्रदेश आध्यक्षा पत्रकार स्नेहा उत्तम मडावी यांना दुसऱ्यांसदा संधी देण्यात आली आहे. महिला प्रदेश उपाध्यक्षा सौ. हलिमाताई शेख, संजय बाबा सरोदे, पत्रकार स्नेहा उत्तम मडावी यांची निवड उपस्थित सं. अ. बीबी




वैद्य सह मान्यवराच्या हस्ते व आदेशानुसार करण्यात आली. या प्रसंगी निवडीचे प्रमाणपत्र प्रदेशाध्यक्ष श्री प्रताप साळुंखे पाटील संस्थापक आध्यक्ष भागवत वैद्य साहेब पत्रकार सुनिल (सुज्ञान) ज्ञानदेव भोसले, महिला आघाडी श्रद्धा कंडुडे, जयश्री बस्ते नाशिक विभाग आध्यक्षा, धर्मेंद्र कदम नंदा भंडारे बीड मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या ठिकाणी झालेल्या बैठकीत संघटना पुढे कशी आणता येईल संघटनाचे कार्य व स्वरूप नक्की काय असणार लोकशाही पत्रकार संघातिल् सभासद यांना या व्यवसायचे स्वरूप तसेच या संघटने मार्फत महिलांना रोजगारनिर्मिती असे अनेक मुद्दे मांडण्यात आले.पत्रकार यांना टोल माफी, जाहिरात धोरण, विविध मागण्या बाबतीत लवकरच मंत्री मोहदय यांना भेटून चर्च्या कारणार आहे. यावेळी महाराष्ट्र मधून मोठ्या प्रमाणात लोकशाही पत्रकार संघांचे पदाधिकारी उपास्तीत होते.

# महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संपर्क कार्यालय उद्घाटन कामगारांचे हक्क आणि त्यांच्या समस्यांवर उपाय काढू - अमरसिंह पंडित

बीड(प्रतिनिधी)

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना बीड संपर्क कार्यालय शाहूनगर बीड येथे दिनांक १४ मे २०२५ रोजी उद्घाटन म्हणून राष्ट्रवादी पक्षाचे सरचिटणीस मा आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या हस्ते संपन या वेळी राष्ट्रवादी चे नेते, शेख निजामभाई, फारुक पटेल, प्रा.गोपाळ धांडे. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष नगरसेवक शेख अमर उपस्थित होते

या उद्घाटन प्रसंगी मा आमदार अमरसिंहजी पंडित यांनी कामगारांना मार्गदर्शन करताना सांगितले. महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना सामाजिक न्याय आणि समानता स्थापित करण्यासाठी काम करताते जेणेकरून सर्व कामगारांना समान संधी आणि वागणूक मिळेल त्याच पद्धतीने काम करावे सर्व पदाधिकारी यांनी संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कामाच्या अटी सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांचे काम कौतुक करण्यासारखे आहे कारण ते कामगारांना अधिक चांगल्या वेतन, कामाच्या अटी आणि सुरक्षित कामाच्या वातावरणासाठी लढायला मदत करतात येत्या काही दिवसात कामगारांचे



रखडलेले समस्या बाबतीत लवकरच जिल्हा कामगार अधिकारी व कामगार संबधित कर्मचारी यांच्या समवेत जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेची बैठक लावण्यात येईल असे आश्वासन माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांनी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात दिले


# शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

## शाळेचा शेकडा ९४.३३% टक्के निकाल!

बीड दि.१३(प्रतिनिधी)-

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा शेकडा ९४.३३ टक्के इतका लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ५८





परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्या पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या ५५ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामुळे शाळेचा शेकडा ९४.५४% टक्के निकाल लागला आहे. यामध्ये कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि चि. शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

कु. सपना शिंदे हिने ९०.२० गुण मिळवून चौथा क्रमांक चि. जैद सय्यद ९०.०० गुण घेत पाचवा क्रमांक मिळविला तर कु. शुभांगी सोलनकर हिने ८९.६० गुण घेत सहावा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा तथा जेष्ठ मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, संस्थापक सचिव तथा जेष्ठ मार्ग दर्शक श्री. गोविंदराव वाघ साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर , सचिव श्री. नामदेवराव वाघ सर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम गणेश श्री गुजर सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिदोड येथील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सौ वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका

# महाराष्ट्र राज्य शासनाच्या राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल पुरस्काराने सन्मानित

नर्सिंग क्षेत्रातिल प्रतिष्ठीत समजला जाणारा महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल आंतरराष्ट्रीय परिचारिका पुरस्कार वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका ऊप जिल्हा रूग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर यांना मा.प्रकाशजी आबीटकर सार्वजनिक आरोग्य मंत्री व खासदार धर्यशील माने यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले दिनांक १२ मे २०२५ ला राजश्री शाहू महाराज सभागृह कोल्हापूर येथे महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल नर्सेस पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी मंचावर उपस्थित खासदार धर्यशल माने, प्रकाश आबिटकर सार्वजनिक आरोग्य मंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री,




डॉ नितीन आंबाडेकर संचालक आरोग्य सेवा मंडळ मुंबई, डॉ पुरुषोत्तम मडावी उपसंचालक शुश्रुषा आरोग्य सेवा मंडळ मुंबई, डॉ निलिमा सोनवणे सह.संचालक शुश्रुषा आरोग्य सेवा मुंबई, ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय सहा पुरस्काराचे वितरण करण्यात आले.त्यामध्ये वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका ऊप जिल्हा रूग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर यांना धर्यशिल माने खासदार व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व ईतर मान्यवरांच्या उपस्थितीत वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका यांना प्रदान करण्यात आला.

# पाटोद्यात बेकायदेशीर वृक्षतोड; वन विभागाच्या हलगर्जीपणामुळे पर्यावरण धोक्यात

पाटोदा (फयाज सय्यद)

पाटोदा तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून, त्यामुळे परिसरातील नैसर्गिक परिसंस्था धोक्यात आली आहे. हे सगळं घडत असताना वन विभाग मात्र निवांत असून, त्यांच्या हलगर्जीपणामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत आहे.


स्थानिक पर्यावरणप्रेमींनी ही माहिती वन विभागाला दिली तेव्हा अधिकारी मुख्यालय ठिकाणी उपस्थित नव्हते तर अधिकाऱ्यांनी पर्यावरणप्रेमींनी महिला कर्मचारी असल्याने कर्मचाऱ्यांच्या पतीचा दिला नंबर ही बाब अतिशय गंभीर असून ह्या प्रकरणाची वरिष्ठांनी चौकशी करून कारवाई केली पाहिजे तसेच पाटोदा वन विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचा पूर्ण अभाव आहे. यामुळे वृक्षतोड करणाऱ्यांना मोकळे रान मिळाले आहे.वनविभागाचे कर्मचारी ही स्थिती रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. त्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि दुर्लक्षामुळे शेकडो झाडांची कत्तल होत आहे. हे केवळ कायद्याचे उल्लंघन नाही तर भविष्यातील पिढ्यांवर अन्याय करणारा अपराध आहे.पर्यावरणवाद्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. दोषी कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कडक शिस्तभंगात्मक कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली जात आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.




## इक़रा नियामत हावरे चे इयत्ता दहावीत विशेष प्राविण्याने घवघवीत यश

बीड (प्रतिनिधी)

शहरातील सर सय्यद माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी इक़रा नियामत हावरे ने इयत्ता दहावीत ९०.८०% गुण घेत विशेष प्राविण्याने घवघवीत यश मिळविल्याने तिच्यावर समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. इक़राचे इयत्ता दहावीचे वर्ष होते तरी घरची सर्वसाधारण परिस्थिती असल्याने मोठी रक्कम देऊन खाजगी शिकवणीतून तिला ट्युशन लावता आली नाही. फक्त गणित विषयासाठी तिच्या वडीलांनी कसेबसे एका घरगुती शिक्षकाकडे शिकवणी लावली होती. बाकी सर्व विषयांचे शिक्षण शाळा आणि स्वतः अभ्यास करून पूर्ण केले. उर्दू ९४, मराठी ८७, इंग्रजी ९१, गणित ८९, विज्ञान ८७ आणि समाजशास्त्रात ९० असे गुण घेत ९०.८०% गुण मिळविले. विशेष प्राविण्याने मिळविलेल्या या घवघवीत यशामुळे तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिने यापुढेही शैक्षणिक आयुष्यात असेच दैदिप्यमान यश मिळवावे अशा शुभेच्छा दिल्या जात आहे.



## पठाण सलमान खान रईस खानचे ८७ टक्के घेवून घवघवीत यश



बीड (प्रतिनिधी)

बीड येथील ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल (डीपीएस) चा विद्यार्थी आणि प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.रईस पठाण यांचा मुलगा पठाण सलमान खान याने ८७ टक्के गुण घेवून घवघवीत यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पठाण सलमान खान याने इयत्ता १० वी परिक्षा सीबीएसई बोर्डच्या माध्यमातून दिली. यामध्ये त्याने इंग्रजी, मराठी, मॅथेमॅटिक्स, सायन्स, सोशन सायन्स आणि इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी या सर्वच विषयात विशेष प्राविण्यासह गुण घेवून ए प्लस श्रेणी मिळविली आहे. या यशाबद्दल त्याचे आई-वडील, नातेवाईक, स्कूलचे संचालक, मुख्याध्यापक यांसह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



मिलिया गर्ल्स हायस्कूल बीडची विद्यार्थिनी खान अलीना फातिमा फेरोज खान या विद्यार्थिनीने इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये ९२ टक्के गुण घेऊन शाळेत चौथा क्रमांक पटकाविला आहे आलीना ही समाजसेवक फिरोज खान यांची कन्या असून खूप हलाखीच्या परिस्थितीमध्ये अभ्यास करून तिने हे गुण मिळविले आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्रीमती खान सभीहा बेगम व मिलिया गर्ल्स हायस्कूलचे मुख्याध्यापक सिद्दिकी इरफान सर तसेच समाजसेवक मुसाखान साहेब व शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिला शुभेच्छा दिल्या असून तिचा समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# चौसाळा येथील गुरुदत्त माध्यमिक विद्यालयाचा एस.एस.सी. निकाल ९७.६७ टक्के

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील चौसाळा येथिल गुरुदत्त माध्यमिक विद्यालय या शाळेचा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल अत्यंत उज्ज्वल लागला आहे. एकूण ४२ विद्यार्थ्यांपैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेने ९७.६७ टक्के निकालाची उजळणी केली आहे. विद्यार्थिनी जोगदंड सानिका उमेश हिने ९५.८०% गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. भरणे सलोनी विवेक व भरणे पूनम बाळू यांनी प्रत्येकी ९०.४% गुण मिळवून संयुक्त द्वितीय क्रमांक मिळवला, तर सालपे प्रांजली प्रशांत हिने ९०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन गुरु महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, चौसाळा या संस्थेचे अध्यक्ष लोकनेते मा. डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब , उपाध्यक्ष मा. सयाजी (बप्पा) शिंदे, कोषाध्यक्ष मा.ङ रामेश्वरजी काशीद तसेच शालेय समितीचे अध्यक्ष मा. श्री उमेश आंधळे व मा. संभाजी (आबा) जोगदंड यांनी केले असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. या निकालामागे गुरुदत्त माध्यमिक विद्यालय चौसाळा चे मुख्याध्यापक, श्रीमंत चौधरी शिक्षकवृंद, पालकवर्ग आणि संपूर्ण शाळेचे परिश्रम अधोरेखित होत आहेत.

# तेलगाव जिल्हा परिषद गटात चेहरा नवा ,फक्त बाळासाहेब सोनटक्के चीच हवा

तेलगाव (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहू लागले असून आता निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे गावागावात राजकारणाची चर्चा सुरू आहे. तेलगाव जिल्हा परिषद गट हा बीड जिल्ह्यातील मातब्बर नेत्याचा गट मानला जातो.परंतु सद्य परिस्थिती पाहता व राजकीय उलथा पालत पाहता या तेलगाव जिल्हा परिषद गटामध्ये नवीन चेहऱ्याला संधी मिळू शकते .आणि येथील मतदार वर्ग हा नवीन चेहऱ्याच्या शोधात असून बाळासाहेब सोनटक्के यांच्या रूपाने युवकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.

बाळासाहेब सोनटक्के हे अनेक वर्षापासून सामाजिक कार्य करत असून ते कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिल नाहीत.सतत समाजसेवेचा ध्यास घेतलेले बाळासाहेब हे सर्वसामान्य लोकांमध्ये आपुलकीचे वाटतात कुठलीही समस्या असो त्या समस्येला मदत करण्यासाठी बाळासाहेब सोनटक्के हे कधीही तत्पर असतात.त्यांच्याकडे ना कधी राजकारण ना कधी जात न धर्म त्यामुळे बाळासाहेब सोनटक्के हे या जिल्हा परिषद गटामध्ये चर्चेमध्ये आहेत .अनेक महिन्यापासून स्थगित असणाऱ्या निवडणुका होणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.आणि बाळासाहेब सोनटक्के यांना जिल्हा परिषदेमध्ये पाठवून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी व तेलगाव मतदार संघावर प्रस्थापितांचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी बाळासाहेब सोनटक्के हे योग्य उमेदवार असल्याने आज तेलगाव जिल्हा परिषद मतदार संघामध्ये गावागावात चर्चा सुरू आहे येणाऱ्या काळात एक प्रामाणिक, निपक्ष व धडाडीचा तरुण कार्यकर्ता या गटाचे प्रतिनिधित्व करणार असल्याने तेलगाव जिल्हा परिषद गटामध्ये बाळासाहेब सोनटक्के यांची हवा आत्तापासूनच सुरू झाली आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com